# सहसंचालक,

उच्च शिक्षण ,मुंबई विभाग , मुंबई

एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१

www.jdhemumbai.gov.in Tel&Fax No. 022 22656600, 22691523

e-mail : jd@jdhemumbai.gov..in admin@jdhemumbai.org.in


क्र.सहस/मुंवि/३-लेखा / शिष्यवृत्ती/२०१२/ ४९१ दिनांक : २४।९।२०१२

**परिपत्रक / बैठकीची सूचना**

प्रति,

प्राचार्य

सर्व शासकीय व अशासकीय अनुदानीत,

कायम विनाअनुदानीत महाविद्यालये

**मुंबई शहर, मुंबई उपनगर,**

**विषय :- केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर**
**(Post Matric ) शिष्यवृत्ती योजना सन २०१२-२०१३.**
**प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक :-** २७-९-२०१२

मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द व पारशी या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिक्षणासाठी केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २००७-०८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा व त्यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोईस्करपणे उपलब्ध व्हावा व तो विद्यार्थ्यांना केव्हाही सहजपणे भरता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती अर्ज (**Fresh**) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (**Renewal**) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात झालेले आहेत. सदर अर्ज स्विकारण्याची **अंतिम तारिख ३० सप्टेंबर , २०१२ पर्यंत** आहे.

सदर शिष्यवृत्तीस विद्यार्थ्यांचा मुंबई विभागातील अल्पसा प्रतिसाद पाहता महाविद्यालय / संस्था यांच्या स्तरावर प्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे उद्बोधन करुन त्यांना वरील शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी योग्य त्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात जेणेकरून सदर शिष्यवृत्तीचा इष्टांक पूर्ण करण्यात मदत होईल.

वरील विषयास अनुसरुन मुंबई विभागातील संबंधीत सर्व संस्थांचा प्रशिक्षण कार्यक्रम **गुरुवार दिनांक २७ सप्टेंबर २०१२,** रोजी दुपारी **३.०० वाजता जय हिंद महाविद्यालय ए. रोड चर्चगेट मुंबई ४०००२०,** येथे आयोजित केला आहे. सदर प्रशिक्षणासाठी आपल्या संस्थेमधील शिष्यवृत्तीचे कामकाज हाताळणाऱ्या व संगणकीय ज्ञान असणाऱ्या एक कर्मचाऱ्यास प्रशिक्षण कार्यक्रमास पाठविण्यात यावे. सदर कर्मचाऱ्यास वेळेवर उपस्थित राहण्याबाबत आपल्यास्तरावर कळविण्यात यावे.

सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.

प्रति,

१) मा. शिक्षण संचालक, ( उ.शि. ) ,महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.

२) प्राचार्य. **जय हिंद महाविद्यालय ए. रोड चर्चगेट मुंबई ४०००२०,** कार्यालय क्रमांक : २२०४०२५६ .

(2)

Sybd for Ha.
583
25/9/12

# महाराष्ट्र शासन


विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

*शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.*

ई-मेल पत्ता :- jdire.९९१०@gmail.com — दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०.


क्र. विससं/उशि/कोविप/पीएमएस१२-१३/ 9८६२ — दिनांक :- 2१/09/12

REG/ECD/12-13/ 365
24/9/12

प्रति,

प्राचार्य,

सर्व शासकीय, अशासकीय, कनिष्ठ, वरिष्ठ, आय.टी.आय., व्होकेशनल संस्था व इतर महाविद्यालये.

ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे

**विषय :- अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेसाठी कार्यशाळेचे आयोजनाबाबत...**

**संदर्भ:- १. संचालनालयाची विषयांकित योजनेची दि. १५ व १८ ऑगस्ट २०१२ रोजीच्या प्रमुख वर्तमान पत्रांतील जाहिरात.**

**२. या कार्यालयाचे पत्र क्र. विससं/उशि/कोविप/१७९३, दि. ०७.०९.२०१२.**

उपरोक्त संदर्भाधीन विषयानुसार पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती २०१२-१३ या योजनेचा लाभ या विभागांतर्गत असलेल्या ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांतील मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शीख व पारशी या अल्पसंख्यांक समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली या कार्यालयातर्फे खाली नमुद केलेल्या ठिकाणी व त्या त्या तारखांना कार्यशाळेचे आयोजन केले आहे. तरी सदर कार्यशाळेसाठी आपण प्राचार्य व संबंधित लिपिक दोनों उपस्थित रहावे.

| अ. क्र. | दिनांक | वेळ | कार्यशाळेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | दि. २५.०९.२०१२ | दुपारी १ ते ३ पर्यंत | सी. के. ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पनवेल, जि. रायगड. (CKT College) |
| २. | दि. २७.०९.२०१२ | दुपारी १ ते ३ पर्यंत | आबासाहेब मराठे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, विखारे गोठणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी. |

NC COE/Scholarship Section
DR(Sp. cell)

24/9/12
Registrar

B. Jadhav
विभागीय सहसंचालक.
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल. 21/9/12

प्रत :-

१. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहिती स्तव सादर.
सदर कार्यशाळेसाठी वरील दिनांकास आपल्या कार्यालयाकडून दोन प्रशिक्षक द्यावेत हि विनंती.